# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### प्रेस नोट

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कर्मचारी श्री.रमेश दामोदर मुखेकर (वित्त व लेखा विभाग) यांनी साहिल महेश कदम या विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या बी.कॉम. या अभ्यासक्रमाचे गुणपत्रक तसेच पदवी प्रमाणपत्र मिळवून देतो, असे सांगून सदर विद्यार्थ्याकडून रू.७०,०००/– (रूपये सत्तर हजार फक्त) गुगल पेद्वारे स्वीकारून व्हॉट्सॲपवर संगणकाद्वारे तयार केलेल्या मूळ कागदपत्रांसारख्या भासणाऱ्या इमेजेस दिल्या, अशा आशयाची तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली.

या संदर्भात नमूद करण्यात येते की, सदर कर्मचारी हा विद्यापीठाच्या परीक्षा विभागात कार्यरत नाही तसेच त्याने व्हॉट्सॲपवर तयार करून दिलेली कागदपत्रे परीक्षा विभागाच्या अभिलेखांशी सुसंगत नाहीत, असे निदर्शनास आले. तसेच श्री.मुखेकर यांनी पैसे स्वीकारून सदर गैरकृत्यात सहभाग घेतल्याचे दिसून येते.

सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन श्री.मुखेकर यांना तात्काळ प्रभावाने विद्यापीठ सेवेतून निलंबित करण्यात आले असून या प्रकरणाची व्याप्ती विचारात घेता, सखोल तपासाच्या दृष्टीने चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे डॉ. राजेंद्र तलवारे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी रीतसर फिर्याद दिली आहे. पोलीस तपासात ज्यांचा या गैरकृत्यात सहभाग आढळून येईल, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

सदरचा गैरप्रकार श्री.मुखेकर यांनी परीक्षा विभागाशी संबंधित नसतांना तसेच परीक्षा विभागाच्या व्यवस्थेबाबतचे त्यांचे ज्ञान वापरून केलेला असल्याचे निदर्शनास आलेले असून यात व्यवस्थागत इतर कोणाचा सहभाग आहे का, ही बाब पोलीस तपासात स्पष्ट होईल.

विद्यापीठाकडून जारी करण्यात येणाऱ्या परीक्षेच्या गुणपत्रिका व पदवीप्रमाणपत्रांमध्ये उच्च दर्जाच्या सुरक्षामानकांचा समावेश असल्यामुळे या संदर्भातील अफवांवर विद्यार्थी आणि पालकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
प्रभारी कुलसचिव

दिनांक : २९ जुलै, २०२६